# मराठी विभाग

## मराठी विभागाविषयी ( About the Department)

१९६८ साली महाविद्यालयाच्या निर्मितीपासूनच मराठी विभाग सुरू असून या विभागात बी .ए भाग -१,२ व ३ तसेच बी . कॉम भाग -१ व भाग २ या अभ्यासक्रमात आवश्यक मराठी हा विषय शिकवला जातो तर बी .ए भाग १,२ व ३ ला मराठी साहित्य हा विषय सुद्धा विद्यार्थ्यांना ऐच्छिक विषय म्हणून शिकता येतो . १९९९ साली एम ए मराठीची सुरुवात महाविद्यालयात करण्यात आली तर २०२१ पासून महाविद्यालयात बी .एस .सी चा अभ्यासक्रम सुरू झाल्यानंतर बी .एस . सी भाग -१ ला सुद्धा मराठी हा विषय शिकविण्यात येतो . २०१७ पासून मराठी विषयात आचार्य पदवी (पीएच .डी) संशोधनाचे केंद्र सुरू करण्यात आले या संशोधन केंद्रात एकूण ११ विद्यार्थी सध्या कार्यरत आहे तसेच संशोधक विद्यार्थ्यांकरिता संशोधन अध्यापनाकरिता आवश्यक असे समृद्ध ग्रंथालय महाविद्यालयात आहे .मराठी विभागा अंतर्गत अनेक विद्यार्थ्यांनी त्यांचे उच्च शिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले आणि सध्या ते अनेक शासकीय निमशासकीय क्षेत्रामध्ये कार्यरत आहे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातून गुणवत्ता यादीमध्ये या विभागाच्या विद्यार्थ्यांनी स्थान मिळवले आहेत .२००२ पर्यत मराठी विभागाच्या प्रमुखपदी डॉ . नलिनी सोमकुवर (समाजवादी व स्त्रीवादी विचारधारेच्या प्राध्यापक) या कार्यरत होत्या त्यानंतर डॉ . इंद्रजीत ओरके (सामाजिक कार्यकर्ते व साहित्यिक )यांनी 2020 पर्यंत मराठी विभाग प्रमुखांची जबाबदारी सांभाळली सध्या डॉ .मनीषा नागपुरे या मराठी विभाग प्रमुख कार्यरत आहे एकूणच लोकप्रिय शिक्षकांचा वारसा मराठी विभागाला लाभला आहे ज्यांनी त्यांच्या समर्पित अध्यापन आणि मार्गदर्शनाद्वारे आपल्या काळात विद्यार्थ्यांवर अविश्वसनीय छाप सोडली . विभागातील प्राध्यापक नेहमीच संशोधनात सक्रिय असून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी प्रयत्नरत असतात .मराठी विषयाच्या विद्यार्थ्यांना विषयाचे सखोल व सहज सुलभ आकलन होण्यासाठी अध्ययन अध्यापन प्रक्रियेत अनेक सुधारणा विभागाकडून केल्या जातात मागील पाच वर्षापासून इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा वापर करून अध्ययन अध्यापन प्रक्रिया सहज सुलभ करण्यात आली आहे महाविद्यालयाच्या अधिकृत वेबसाईटवर मराठी विषयाच्या विद्यार्थ्यांकरता (study material)अभ्यास साहित्य आणि प्रश्नपेढी (questions Bank) उपलब्ध आहे .विद्यार्थ्यांचे लेखनकौशल्य विकसित करण्यासाठी भित्तिपत्रकाचा उपक्रम राबविण्यात येतो त्यांचे लेखन महाविद्यालयाच्या वार्षिकांकात समाविष्ट केले जाते . विद्यार्थ्यांची संशोधनवृत्ती विकसित करण्यासाठी विविध कार्यशाळा व चर्चासत्राचे आयोजन केले जाते

**आमचे बोधवाक्य ( Our Moto) - ' मराठी आहे ज्ञानाचा सागर सर्वत्र करू मराठीचा जागर"**

## अभ्यासक्रम   ( Subjects  concern of the Department )

- बी.ए भाग १,२ व ३ आवश्यक मराठी सत्र पद्धती ( सहा सत्र )
- बी.ए . भाग १,२ व ३ ऐच्छिक मराठी ( सहा सत्र)
- बी. कॉम भाग -१ व भाग २ आवश्यक मराठी ( चार सत्र)
- बी.एस .सी . भाग -१ आवश्यक मराठी (सत्र दोन)
- एम. ए भाग -१ व भाग- २ सत्र पद्धती ( चार सत्र )

## विभागातील प्राध्यापक  (Faculties In the Department)

| | |
|---|---|
|  | **डॉ . इंद्रजित ओरके ( निवृत्त विभाग प्रमुख २०२० )**<br>**एम.ए ( मराठी ) नेट , पीएच .डी** |
|  | **डॉ. मनीषा नागपुरे**<br>**एम.ए ( मराठी ) बी .एड. ,एम.फिल्.,नेट, पीएच.डी**<br>**मराठी विभाग प्रमुख** |
|  | **डॉ. अमृता डोरलीकर एम.ए ( मराठी )**<br>**एम.फिल , नेट, पीएच.डी**<br>**सहायक प्राध्यापक** |
|  | **प्रा. अमीत गजभीये**<br>**एम. ए. ,  एम. फिल.,  नेट, सेट (मराठी)**<br>**अंशकालीन  प्राध्यापक**<br>**सहायक प्राध्यापक (मराठी विभाग )** |

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत (Merit list) स्थान प्राप्त केलेले विभागातील विद्यार्थी   Merit Students /Achievers: (photos)

| | | | |
|---|---|---|---|
| **1** | **Ms. Priya sahare** | **4th Merit (Summer 2018)** |  |
| **2** | **Ms. Bharti D. Shastri** | **1st Merit &Gold Medalist (Summer 2019)** |  |
| **3** | **Ms. Dipmala Wadai** | **4th Merit (summer 2020)** |  |
| **4** | **Ms. Shubhangi D. Dhargave** | **1st Merit & Gold Medalist (Summer 2021** |  |
| **5** | **Ms. Pragati Y. Gajbhiye** | **2nd Merit (Summer 2021)** |  |
| **6** | **Ms.Pratima T. Wankhede** | **4th Merit (Summer 2021)** |  |
| **7** | **Ms. Dhrupada B. Haware** | **6th Merit (Summer 2021)** |  |
| **8** | **Ms. Jaya C. Gajbhiye** | **8th Merit (Summer 2021)** |  |

| | | | |
|---|---|---|---|
| 9 | Ms. Tina D. Wanjari | 2nd Merit (Summer 2022) |  |
| 10 | Ms. Apurva S. Manwatkar | 6th Merit (Summer 2022) |  |
| 11 | Ms. Pranali D. Gajbhiye | 10th Merit (Summer 2022) |  |

## विभागातील आचार्य पदवी प्राप्त विद्यार्थी (Awarded Ph.D Students)

| अ.क्र. | नाव | आचार्य पदवी प्राप्त विद्यार्थी संख्या | सद्यस्थितीतील चालू संशोधन विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| 1 | डॉ . इंद्रजित ओरके<br>निवृत्त विभाग प्रमुख | 07 | 05 |
| 2 | डॉ. मनीषा नागपुरे<br>विभाग प्रमुख | 02 | 05 |

## मराठी विभागातर्फे राबविण्यात आलेले विविध उपक्रम व कार्यक्रम(Departmental Activity)

- भाषा अभ्यास मंडळाचे उद्घाटन
- एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र – अस्मितादर्शचे ५०वर्ष
- एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र –वामन निंबाळकर आणि ज्योती लांजेवार:वाङ्मयीन लेखन
- मराठी भाषा पंधरवाडा
- कविता कवी आणि कवितेचे अध्यापन
- एक दिवसीय राष्ट्रीय वेबिनार : एकवीसावे शतक : साहित्यसमोरील आव्हाने
- मराठी भाषा गौरव दिन
- मराठी निबंध स्पर्धा , विद्यार्थ्यांचे परिसंवाद , लेखक आपल्या भेटीला
- अभ्यासक्रमावर आधारित अतिथी व्याख्यान
- महानुभाव साहित्यप्रज्ञाशोध परीक्षा,संवाद,निवेदन,लेखन कार्यशाळा ,व्याकरण कार्यशाळा
- नाटयप्रयोग – विभागात प्रोजेक्टरवर दाखविण्यात आला (Digital Classroom )

# RTM Nagpur University Syllbus

## B.A

### B.A - Compulsary Marathi

https://nagpuruniversity.ac.in/writereaddata/fckimagefile/BA%20Marathi%20Compulsory.pdf

### B.A -Marathi Literatuare

https://nagpuruniversity.ac.in/writereaddata/fckimagefile/BA%20Marathi%20Litreture.pdf

## B.Com

### B.Com - Compulsory Marathi

https://nagpuruniversity.ac.in/writereaddata/fckimagefile/Language%20of%20Matathi%20n%20Hindi%20Syllabus.pdf

## B.SC

### B.sc I - Complusary Marathi

https://www.nagpuruniversity.ac.in/links/Syllabus/UG/Faculty_of_Science/Languages_in_Science_revised_syllabus_23092020.pdf

## M.A (Marathi) M.A I SEM

https://nagpuruniversity.ac.in/writereaddata/fckimagefile/2%20MA%20Marathi.pdf

### M.A II SEM

https://nagpuruniversity.ac.in/writereaddata/fckimagefile/Marathi1.pdf

## E- Content and Study Materials

**Online Lecture Series for B.com II Sem (Com.Marathi)**

PWS Teacher’s (Offical)

**Dr.Manisha Nagpure’s Presentation on B.A I Sem MLT**

**Topic - नाटक घटक क्र. १.मराठी रंगभूमीचा स्थूल आढावा**

https://www.youtube.com/live/D1czolO2d7o?feature=share

**Dr.Manisha Nagpure’s Presentation on B.A III Sem MLT**

**Topic - अरुणा ढेरे यांची कविता**

https://www.youtube.com/live/gyOgdhJJvyc?feature=share

**Dr.Manisha Nagpure Presentation on B.A II Sem com.Marathi**

**Topic - कविता – उषकाल होता होता**

http:// www.youtube.com/live/H-XWUCyFFfY?feature=share

**Dr.Manisha Nagpure’s Presentation on B.Com.II Sem com.Marathi**

**Topic - कविता – वामन निंबाळकर यांची कविता**

https://youtube.com/channel/UCpLvUFRK85FMYUXYY0Hx2zw

**Dr.Amruta Dorlikar’s Presentation on B.Com.II Sem com.Marathi**

**Topic - पाठ –नातं कथा**


https://www.youtube.com/live/qInODBI6ruY?feature=share


**Dr.Amruta Dorlikar’s Presentation on B.Com.II Sem com.Marathi**


**Topic - पाठ –गाडगेबांबानी शाळा दिली**


https://www.youtube.com/live/tLArqgLIaQo?feature=share


# Departmental Contribution in Book Publication




# Photos of Departmental National Seminar and

# Achievement of students



चर्चासत्राचे उद्घाटन





## 'अस्मितादर्श' साहित्यासाठी दिशादर्शी

**वसंत आबाजी डहाके यांचे प्रतिपादन**

म. टा. प्रतिनिधी, नागपूर

अस्मितादर्शने साहित्यातील केवळ पारंपरिक विचारांनाच नाकारले नाही तर ललित आणि समाजाभिमुख वैचारिक साहित्याला नवी दिशा दिली. असे हे साहित्यासाठी दिशादर्शी ठरलेले 'अस्मितादर्श' या नियतकालिकाने सामाजिक सुंदरतेत रूपवादी समीक्षेभोवती फिरणारी समीक्षा शोधली. समाजातील वेगवेगळया विषयांवर चर्चा घडवून आणत साहित्याद्वारे जनजागृतीची चळवळ उभारली', असे प्रतिपादन ज्येष्ठ समीक्षक वसंत आबाजी डहाके यांनी केले.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ आणि पीडब्लूएस कला व वाणिज्य महाविद्यालय यांच्या संयुक्तवतीने मंगळवारी सिद्धार्थ सभागृह, पीडब्लूएस कॉलेज येथे 'अस्मितादर्शची ५० वर्षे' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. वसंत आबाजी डहाके यांच्या हस्ते चर्चासत्राचे उद्घाटन झाले. व्यासपीठावर उद्घाटनीय सत्राचे अध्यक्ष डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांच्यासह डॉ. गंगाधर पानतावणे, डॉ. मधूकर वासनिक, डॉ. सुधीर गव्हाणे व छत्तीसगड मराठी साहित्य परिषदेचे अध्यक्ष कपूर वासनिक यांची प्रमुख उपस्थिती होते.

डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी अध्यक्षीय भाषणात म्हणाले, 'नियतकालिकांच्या सेवेचा आदर्श डॉ. पानतावणे यांच्याकडून घ्यावा असाच आहे. ताठ मानेने जगायला शिकविणाऱ्या जगातील ज्येष्ठ नियतकालिकांमध्ये अस्मितादर्शचे स्थान आहे. अस्मितादर्श हे केवळ दलितांचे नव्हे तर प्रत्येक संवेदनशील मनाच्या जाणिवांचे व्यासपीठ आहे.' कार्यक्रमाची भूमिका डॉ. इंद्रजीत ओरके यांनी मांडली तर सूत्रसंचालन डॉ. मनिषा नागपुरे यांनी केले. त्यानंतर डॉ. विलास चिं. देशपांडे यांच्या अध्यक्षतेत 'अस्मितादर्शची ५० वर्षे आणि मराठी वाङ्मयीन नियतकालिके' विषयावर डॉ. अनिल नितनवरे यांचे तर 'मराठीतील वैचारिक नियतकालिकांची सद्यःस्थिती' विषयावर डॉ. अजय देशपांडे यांनी विचार मांडले.



चर्चासत्राचे उद्घाटन

व्यासपीठावर उद्घाटन प्रसंगी डावीकडून डॉ.अपर्णा लांजेवार, डॉ.श्रीपाद जोशी, डॉ.गंगाधर पानतावणे, ॲड.पी.झेड. लांजेवार, डॉ.कपूर वासनिक



## संविधान बदलाचे वारे, सावध व्हा

**राष्ट्रीय चर्चासत्र : उत्तम कांबळे यांचा इशारा**

लोकमत न्यूज नेटवर्क

नागपूर : देशात संविधान बदलाचे वारे वाहू लागले आहेत. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांनी गाफिल राहू नये, सावध व्हा, असा इशारा ठाणे येथे भरलेल्या ८४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष उत्तम कांबळे यांनी येथे दिला.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ, डॉ. आंबेडकर कॉलेजी दीक्षाभूमी आणि डॉ. मधुकरराव वासनिक पी.डब्ल्यू.एस. महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दीक्षाभूमीतील दादासाहेब कुंभारे सभागृहात राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. 'प्रा. वामन निंबाळकर व डॉ. ज्योती लांजेवार वाड्मय लेखन व सामाजिक-सांस्कृतिक कर्तृत्व' या विषयावर आयोजित या राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी होते.

चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करतांना उत्तम कांबळे, व्यासपीठावर अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी,विचारवंत व समीक्षक डॉ. वि.स.जोग, प्राचार्य डॉ. पी.सी. पवार , प्राचार्य डॉ. यशवंत पाटील, प्रा. दीपककुमार खोब्रागडे आदी.

विचारवंत व समीक्षक डॉ. वि.स.जोग हे प्रमुख अतिथी होते. डॉ. आंबेडकर कॉलेजचे प्राचार्य डॉ. पी.सी. पवार आणि पी.डब्ल्यू.एस. कॉलेजचे प्राचार्य डॉ. यशवंत पाटील हे प्रामुख्याने उपस्थित होते.

डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी वामन निंबाळकर आणि ज्योती लांजेवार यांच्या कवितांवर प्रकाश टाकला. या दोन्ही व्यक्ती चळवळीतून आलेल्या होत्या. त्यामुळे त्यांच्या लेखणीला धार होती, असेही ते म्हणाले.

वि.स. जोग यांनी वामन निंबाळकर आणि ज्योती लांजेवार या आंबेडकरी-दलित कवितेतील वाघ असल्याचे स्पष्ट केले.

प्रा. दीपककुमार खोब्रागडे यांनी प्रास्ताविक केले. अ.भा. मराठी साहित्य महामंडळाचे कार्यवाह डॉ. इंद्रजित ओरके यांनी भूमिका विषद केली. प्रा. रवींद्र तिरपुडे यांनी संचालन केले. प्रा. अमृता डोर्लीकर यांनी आभार मानले. यावेळी पार पडलेल्या चर्चासत्रात डॉ. अजय देशपांडे, अशोक थूल, डॉ. सिद्धार्थ बुटले, डॉ. निशा शेंडे यांनी आपले विचार व्यक्त केले. प्रा. विकास सिडाम, डॉ. देवानंद खोब्रागडे, डॉ. मनिषा नागपुरे आणि डॉ. जलदा ढोके यांचा सहभाग होता.

**आंबेडकरी-दलित साहित्याने पारंपरिक लेखनातून बाहेर पडावे**

आंबेडकरी-दलित साहित्यात पारंपरिक लेखनच होत आहे. यातून आता बाहेर पडण्याची गरज आहे. दलितांनी आदिवासींवर, आदिवासींनी दलितांवर लिहिण्याची गरज आहे. जागतिकीकरणामुळे मोठे परिणाम होत आहे त्यावरही लिखाण होण्याची आवश्यकता आहे, अशी अपेक्षाही उत्तम कांबळे यांनी व्यक्त केली.



## 'अस्मितादर्श'ने अनेक कवी-लेखकांना घडवले

**वसंत आबाजी डहाके यांचे प्रतिपादन**

प्रतिनिधी, नागपूर

'अस्मितादर्श'ने माझ्यासह अनेक कवी, लेखकांना घडवले. त्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देत सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय स्वातंत्र्याचा जागर करणाऱ्या साहित्याची निर्मिती केली, असे प्रतिपादन ज्येष्ठ कवी वसंत आबाजी डहाके यांनी सिद्धार्थ सभागृहात केले. पीडब्ल्यूएसमध्ये ५० वर्षांपूर्वी पहिले अखिल भारतीय दलित साहित्य संमेलन घेण्यात आले होते आणि त्याच कार्यक्रमात 'अस्मितादर्श'ची मुहूर्तमेढ रोवली गेली. महाविद्यालय आणि अस्मितादर्शाला प्रत्येकी ५० वर्षे पूर्ण झाल्याच्यानिमित्ताने अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ आणि डॉ. मधुकरराव वासनिक पीडब्ल्यूएस कला व वाणिज्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'अस्मितादर्शची ५० वर्षे' हे राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. व्यासपीठावर डॉ. गंगाधर पानतावणे, वसंत आबाजी डहाके, महामंडळाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाद जोशी, कपूर वासनिक आणि उद्घाटन सत्राचे अध्यक्ष डॉ. मधुकर वासनिक उपस्थित होते.

**ध्येयनिष्ठ चळवळींना बुडण्याची भीती नसते - पानतावणे**

डॉ. आंबेडकरांचे तत्त्वज्ञान, अस्मितेचे, मानवी मूल्यांचे निदर्शक आहे. त्यांचे तत्त्वज्ञान कल्पनेला आधार मानत नाही. व्यक्तीच्या सामाजिक आणि सांस्कृतिक यातनांना, दुःखांना अभिव्यक्त करणारे हे साहित्य आहे. आंबेडकरी साहित्यात मानवी दुःख केंद्रस्थानी आहे. त्यामुळे जे ध्येयनिष्ठ, ध्येयवादी चळवळीत काम करीत असतात त्यांना बुडण्याची भीती नसते. 'अस्मितादर्श' व्यवसायासाठी किंवा हौसेखातर काढलेले नाही तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची, तत्त्वज्ञानाची ऊर्जा घेऊन काम करीत असल्याने डॉ. आंबेडकरांच्या तत्त्वाने चळवळी करणाऱ्यांना दिशा आणि मुक्कामही माहिती असतो. सर्जनशील आणि वैचारिक चिंतनशील साहित्य लेखन, संशोधनामुळे भविष्य काय, विचार मनात नव्हता तर वाटचाल करीत राहणे एवढेच दृष्टिपथात होते. मुख्य प्रवाह आणि इतर प्रवाह असे विभाजन करता येत नाही. वाङ्मयदृष्टीने ते चुकीचे आहे. मुख्य प्रवाह म्हणजे 'मनुस्मृती' म्हणावे लागेल आणि बाबासाहेब मनुस्मृतीला गवळ्याच्या पोराचा पोवाडा म्हणायचे! अस्मितादर्श चालवताना आर्थिक चणचण कायम राहिली. पेंशनमधील पैसे आम्ही सहकाऱ्यांनी त्यात ओतले आणि अजूनही ओततो आहोत. अस्मितादर्शने साहित्य प्रसवले. कधी कुणाचा दुस्वास केला नाही. विद्वेषातून चळवळी उभ्या राहत नसतात हे बाबासाहेबांनी वेळोवेळी त्यांच्या कामातून दाखवून दिले आहे.













पीपल्स वेलफेअर सोसायटी द्वारा संचलित
डॉ मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस. कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, नागपूर

मराठी भाषा गौरव दिन

प्रमाणपत्र

श्री/ श्रीमती कुमारी/........................................ यांनी डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस. कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, नागपूर येथील मराठी विभागाद्वारे 'मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित ऑनलाईन काव्यलेखन स्पर्धेत यशस्वीरित्या सहभाग घेतला. त्याकरिता प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

मराठी विभाग प्रमुख
डॉ. मनिषा नागपूरे

प्राचार्य
डॉ. यशवंत पाटील


डॉ मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नागपूर

मराठी भाषा पंधरवाडा

प्रमाणपत्र

श्री /श्रीमती /कुमारी----------------------------------------यांनी डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस. कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, नागपूर येथील मराठी विभागाद्वारे मराठी भाषा पंधरवडा निमित्त आयोजित हस्ताक्षर स्पर्धेत यशस्वीरित्या सहभाग घेतला. त्याकरिता प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

मराठी विभाग प्रमुख
डॉ. मनीषा नागपूरे

प्राचार्य
डॉ. यशवंत पाटील

# विभागातील विविध उपक्रम व कार्यक्रम क्षणचित्रे (Departmental activities& photograph)























12:27
LIVE
मुद्रित माध्यमात करिअरच्या संधी
- पत्रकार | बातमीदार , वृत्तलेखक
- वार्ताहर | संपादक, सह संपादक, वृत्तसंपादक
- संदर्भ सेवा
- सहिता लेखक
( क्रीडा, कृषी, सांस्कृतिक, विज्ञान, गुन्हेगारी, राजकीय, शैक्षणिक वृत्त संकलन )
- भाषांतरकार | स्तंभलेखक
- जाहिरात, प्रसिद्धी कॉपी
- प्रूफ रीडर, व्याकरण भाषा दोष, मुद्रण दोष
- ग्राफिक डिझायनर


GPS Map Camera
TEKA NAKA
Google
Nagpur, Maharashtra, India
2838/A/18, near Dr. Madhukarrao Wasnik P.W.S. Arts and Commerce College, Old Teka Naka, Teka Naka, Nagpur, Maharashtra 440002, India
Lat 21.178657°
Long 79.107603°
28/04/22 08:47 AM


Golden Jubilee
DR. MADHUKARRAO WASNIK P.W.S. ARTS & COMMERCE COLLEGE
P.W.S. COLLEGE NAGPUR


Dr Manisha Nagpure
VIJAYA RAUT
Amruta Dorlikar
राखी जाधव